महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक:- २५ मे, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय :- टंकलेखन कौशल्य चाचणी प्रवेश प्रमाणपत्राबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३१ मे, २०२३ रोजी नियोजित खाली नमूद संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता दिनांक ०७ एप्रिल, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या चाचणीकरीता उपस्थित असलेल्या व प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावरील त्यांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | संवर्ग | चाचणी दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ५८/२०२२ | लिपिक टंकलेखक (मराठी व इंग्रजी) - २०२१ | ३१ मे, २०२३ |
| २ | ६०/२०२२ | कर सहायक - २०२१ | ३१ मे, २०२३ |

**२.** टंकलेखन कौशल्य चाचणी कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय चाचणीस प्रवेश दिला जाणार नाही.

**३.** टंकलेखन कौशल्य चाचणीच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणा-या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, चाचणी सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान **दीड तास** अगोदर संबंधित चाचणी उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष चाचणी सुरु होण्याच्या वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर चाचणी कक्षातील स्वत:च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**४. टंकलेखन कौशल्य चाचणी कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना चाचणी कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.**

**५.** आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना’, प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना, परीक्षेच्या वेळी शारीरिक / परस्पर अंतराच्या (Social Distancing) अनुषंगाने करावयाची कार्यवाही / उपाययोजना संदर्भातील सूचना यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणा-या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसारही कारवाई करण्यात येईल.

**६.** प्रवेशप्रमाणपत्र मिळण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in किंवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आणि/अथवा १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग